नॅक मुल्यांकन
'अ'

|| शिक्षण हाच धर्म ||

स्थापना : १९६२



श्री. ऐ.प.दि. जैन पाठशाळा, सोलापूर संचालित,

# वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अ‍ॅण्ड सायन्स, सोलापूर


फोन : (०२१७) २६५१८६३
Website : www.wcassolapur.org


# माहिती पत्रक

## ज्युनिअर कॉलेज

प्रत्येक विद्यार्थी व पालकाने महाविद्यालयाचे असलेले नियम वाचून / समजावून घेऊनच महाविद्यालयात प्रवेश घ्यावा.

।। शिक्षण हाच धर्म ।।

# श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा, सोलापूर.

स्थापना – १८८५

(जैन अल्पसंख्याक संस्था)



## विश्वस्त मंडळ

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीमान अरविंद रावजी दोशी | अध्यक्ष |
| २) | श्रीमान डॉ. रणजित हिरालाल गांधी | विश्वस्त–सचिव |
| ३) | श्रीमान भूषण विलास शहा | विश्वस्त – कोषाध्यक्ष |
| ४) | श्रीमान प्रितम अरविंद दोशी | विश्वस्त |
| ५) | श्रीमान पृथ्वीराज हिरालाल गांधी | विश्वस्त |
| ६) | श्रीमान श्रेयस सुहास शहा | विश्वस्त |
| ७) | श्रीमान वैभव रणजित गांधी | विश्वस्त |
| ८) | श्रीमान पराग अरविंद शहा | विश्वस्त |
| ९) | सौ. प्रियदर्शिनी चंद्रनील जदेरिया | विश्वस्त |
| १०) | श्रीमान ब्रिजेश रणजित गांधी | विश्वस्त |
| ११) | श्रीमान ॲड. सुरेल सुनिल शहा | विश्वस्त |



### नवीन प्रवेशासंबंधी

| वर्ग | किमान पात्रता | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| ११ वी | एस. एस. सी. | उत्तीर्ण गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला व आधारकार्ड<br>अकरावी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रथम संगणकीय फॉर्म भरणे आवश्यक आहे. |
| १२ वी | ११ वी | उत्तीर्ण गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला व नाहरकत प्रमाणपत्र |

✸ प्रथम वर्ष प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्याचे जातीचे व उत्पन्नाचे दाखले काढून घ्यावेत. ऑगस्ट / सप्टेंबरमध्ये त्यांचे फी सवलतीचे अर्ज भरुन घेतले जातील. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व होणाऱ्या नुकसानीस विद्यार्थी जबाबदार राहील. याची नोंद घ्यावी.

" Shikshan Haach Dharma"

# Walchand College of Arts and Science, Solapur

## VISION

" To impart education as a commitment to contributing to the all-round development of the students, to the national empowerment and to the global integrity through the inculcation of *Knowledge, Character, service, Management and Love.*

## MISSION

- Social transformation through humanistic approach
- Development through demystification of science
- Eco-mission for sustainable development.
- Social conscientization for holistic activism
- Building youth through value - based education.
- Ensuring social justice to the marginalized to uphold social equality.
- Equipping professional social workers for contributing to the development of social work culture.

# AIMS & OBJECTIVES OF THE INSTITUTION

1) To impart knowledge and not merely information to render valuable Service in the field of Education

2) To achieve academic excellence in different faculties of Education.

3) To make sincere efforts for all-round development of the personality of the students.

4) To make the students aware of their community and Social responsibilities and to give them social perspectives.

5) To train the students in matters of values like equality of opportunities, education, discipline, respect to the elders, love for truth and justice.

6) To nurture students towards better citizenship.

7) To create an atmosphere of amicability and co-operation conducive to integration.

8) To provide various opportunities to the students for the cultivation of their artistic, academic and athletic talents and to offer them every opportunity for the flowering of their talents.

9) To aim at the cordial relationship between students and teachers contributing to enrichment of the personalities of both.

10) As an educational institution to contribute to the social good by sending responsible citizens to the society.

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देश बांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावले आहे.

## List of Meritorius Student at H.S.C. Exam in College

| Year | Name | Faculty |
|---|---|---|
| 2011-2012 | Mr. Chavan Rupesh Babruwan | Arts |
| | Ms. Patil Sayali Angad | Science |
| 2012-2013 | Ms. Mhetre Varsha Chandrakant | Arts |
| | Mr. Ganpa Rakesh Prabhakar | Science |
| 2013-2014 | Ms. Walekar Aarti Dinesh | Arts |
| | Ms Soni Anushri Kamalkishor | Science |
| 2014-2015 | Mr. Kanjeri Amar Arjun | Arts |
| | Mr. Dulange Amit Gangadhar | Science |
| 2015-2016 | Mr. Kurapati Rekha Poshayya | Arts |
| | Mr. Hiraskar Hrishikesh Ashok | Science |
| 2016-2017 | Mr. Kanjeri Akash Arjun | Arts |
| | Ms. Birajdar Vaishnavi Bhimashankar | Science |
| 2017-2018 | Ms. Upadhye Pooja Sanjay | Arts |
| | Mr. Pawar Rushikesh Gajanansa | Science |
| 2018-2019 | Ms. Chougule Rutika Hanmantu | Arts |
| | Mr. Goski Vyankatesh Basavraj | Science |

श्री ऐलक पन्नालाल दिंगबर जैन पाठशाळा, सोलापूर संचालित

# वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स, सोलापूर

स्थापना ८ जुलै १९६२

# माहिती पत्रक

**श्री. ऐ. प. दि. जैन पाठशाळा** ही संस्था १८८५ साली जैन समाजाचे पितामह श्री. शेठ हिराचंद नेमचंद यांनी श्रमण संस्कृतीचा वारसा एवं संस्कारक्षम शिक्षणाच्या रक्षणार्थ स्थापन केली. ही पाठशाळा सोलापूर शहराची भूषण ठरली. **''शिक्षण हाच धर्म''** हे ब्रीदवाक्य घेऊन शिक्षण क्षेत्रात महान क्रांती केली. प्राकृत संस्कृतच्या अध्ययनाबरोबर धार्मिक, सांस्कृतिक, नैतिक शिक्षणाची जोड दिली. ज्ञान, शील, प्रेम, व्यवस्था, सेवा या पंचसूत्रींच्या संस्काराने संस्कारीत झालेला विद्यार्थी बांधिलकीची जाणीव असलेला उत्तम व आदर्श नागरीक म्हणून ओळखला जाऊ लागला. अशा सर्वांगीण विकासाच्या शैक्षणिक कार्याला वाहून घेतलेली ही संस्था शिक्षणक्षेत्रात नानाविध होणारे बदल लक्षात घेऊन बदलत्या काळानुरुप शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणारी आहे. १३० वर्षाहून अधिक काळ अखंडितपणे महान शिक्षणकार्य करणारी ही पाठशाळा आहे. आजही २१ व्या शतकात उत्तरोत्तर प्रगतीपथावर वाटचाल करणाऱ्या जागतिक शिक्षणपध्दतीला या पाठशाळेने आत्मसात केले आहे. प्राच्य-प्राकृत-संस्कृत शिक्षणाबरोबर आधुनिक संगणकाच्या शिक्षणाची सोय केली आहे. या शिक्षण संस्थेव्दारा संचालित सोलापूर शहारातील नामांकित आणि आदर्श असे आमचे ''वालचंद कॉलेज'' आहे. या संस्थेची उज्वल परंपरा या कॉलेजने जोपासली व संवर्धित केली आहे.

८ जुलै १९६२ ला मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते, **''सोलापूर कॉलेज सोलापूर''** चे उद्घाटन झाले. अल्पावधित **''सोलापूर कॉलेज''** ने नेत्रदीपक प्रगती केली. शिवाजी विद्यापीठांतर्गत एक आदर्श कॉलेज म्हणून ओळखले जाऊ लागले. **तद्नंतर ९ फेब्रुवारी १९८० साली मा. श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या शुभहस्ते '' वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स''** असा नवनामकरणविधी दिव्य आणि भव्य स्वरुपात पार पडला. १९६२ चे **''सोलापूर कॉलेज''** आज **''वालचंद कॉलेज''** या नावाने ओळखले जाऊ लागले. गेली ५७ वर्षे कॉलेजने आदर्श शिक्षणाची उज्वल परंपरा जोपासली आणि अखंडित संवर्धित केली. सिनिअर व ज्युनिअर विभागातील सर्व विषयांचे निकाल पाठशाळा व कॉलेजच्या उज्वल परंपरेला शोभणारे व अभिमानास्पद असेच आहेत. गुणवत्ता यादीमध्ये आमच्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांची नांवे असतातच याचे कारण येथील अनुभवी विषयतज्ज्ञ, नामांकित प्राध्यापक वर्ग, कर्तव्यदक्ष कार्यालयीन मंडळी, व

शिक्षकेतर कर्मचारी. याशिवाय आणखी महत्त्वाच्या कारणांचा येथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे पाठशाळेची विश्वस्त मंडळी. यांनी भव्य-दिव्य आकर्षक इमारती, नवनवीन शैक्षणिक साहित्य प्रशस्त विशाल क्रीडागंण सहज सुलभतेने उपलब्ध करुन दिलेले आहे. या सर्वांच्या सहकार्याने कॉलेजच्या सतत नेत्रदीपक प्रगतीला वाव मिळाला. **नूतन वालचंद कॉलेज परिसर** सर्व आधुनिक शैक्षणिक साधनसामुग्री व सुविधा यांनी युक्त आहे.

*** विविध सोयी**

कॉलेजमधील प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या शैक्षणिक व इतर गरजा लक्षात घेऊनच पाठशाळेने खालील शैक्षणिक सुखसोयी नूतन वास्तूमध्ये उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

**ग्रंथालय -** आर्टस् व सायन्स विभागासाठी सुसज्ज, सर्व सोयींनीयुक्त, प्रशस्त व विस्तृत १,००,६२९ ग्रंथांचे ग्रंथालय आहे. हे विविध संदर्भग्रंथांनी समृध्द आहे. गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्याची व्यवस्था आहे. ज्युनिअर कॉलेज विभागात एकूण २०,९०४ पुस्तके आहेत.

**गणवेष -** महाविद्यालयाने सुचविलेला गणवेष दररोज परिधान करणे तसेच ओळखपत्र गळ्यात घालणे विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे.

**अभ्यासिका -** कॉलेजच्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना कॉलेजच्या तासा-व्यातिरिक्तही अभ्यासिकेमध्ये बसून मनसोक्त वाचन-मनन-चिंतन करता यावे म्हणून स्वतंत्र अभ्यासिकेची सोय केलेली आहे. ही अभ्यासिका सकाळी ८ ते सायं. ६ वाजेपर्यंत उघडी असते. यात क्रमिक पुस्तकाबरोबरच वृत्तपत्रे व नियतकालिके वाचण्यासाठी मिळतात. साहित्य, शिक्षण, अर्थकारण, राजकारण, समाजकारण, धर्म, विज्ञान, व्यवसाय इ. विविध विषयांची शेकडो साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, शोधपत्रिका व सी.ई.टी. पुस्तके आहेत. निवडक विद्यार्थ्यांसाठी जे.ई.ई., एन.ई.ई.टी. मार्गदर्शन व ओळखपत्रावर पुस्तके उपलब्ध केली जातात.

**क्रीडागंण -** सर्व प्रकारच्या क्रीडांना उपयुक्त असे प्रशस्त व विशाल क्रीडांगण कॉलेजच्यासमोरच आहे. देशी-विदेशी खेळांच्या सरावाची सोय आहे. विविध प्रकारच्या स्थानिक, सरकारी जिल्हास्तरीय पातळीवरील, विद्यापीठ पातळीवरील, राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धकांसाठी एक उत्कृष्ट खेळाचे क्रीडागंण क्रीडाप्रेमींना आव्हान देत आहे. तरुण-तरुणी क्रीडापटूंना आपले भवितव्य क्रीडाक्षेत्रात उज्वल करण्यात भरपूर वाव आहे. कॉलेजच्या क्रीडापटूंनी कॉलेजचे नाव सर्व स्तरावर उज्वल केलेले आहे.

**सांस्कृतीक व साहित्यिक मंडळे -** कॉलेजमध्ये वाद-विवाद मंडळ, विविध विषयांची वाङ्मय मंडळे, प्रश्नमंच, संगीतसभा, शलाका, भिंतीपत्रक, नियतकालिके

प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी प्रतिनिधी चालवितात. काव्य-गायन, वाचन, कथाकथन, वक्तृत्वस्पर्धा, युवकमहोत्सव इ. सांस्कतिक कार्यक्रम प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी-प्रतिनिधीच्या सहाय्याने राबविले जातात.

**वसतीगृह** - सर्वच कॉलेजला वसतिगृहे जोडलेली असतात परंतु सर्व सोयींनी युक्त, प्रशस्त, प्रसन्न आणि अभ्यास, मनन-चिंतनास अनुकुल एकांत वातावरण असलेले कॉलेजचे वसतिगृह विद्यार्थ्यांच्या सुविधांकडे लक्ष देण्यासाठी एका प्राध्यापकाची 'रेक्टर' म्हणून नेमणूक केलेली आहे. शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून मुलींसाठी वसतीगृहाची सोय करण्यात आलेली आहे.

**आर्थिक सवलती, शिष्यवृत्या व पारितोषिके** - शासनाच्या नियमाला अनुसरुन मान्य असलेल्या सर्व आर्थिक सवलती, शिष्यवृत्या, विडी कामगारांच्या पाल्यांना मिळणारी शिष्यवृत्ती व पारितोषिके दिली जातात.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर यांच्या पाल्यांना सरकारी शैक्षणिक सवलत मिळते.

स्वातंत्र्य सैनिकांच्या, सैन्यातील सैनिकांच्या तसेच माजी सैनिकांच्या पाल्यांना, विकलांग विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती दिली जाते.

स्व. आ.भा. सोनटक्के गुरुजी स्मारकनिधी ट्रस्ट सोलापूरतर्फे महाविद्यालयातून १२ वी कला व शास्त्र परिक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या व याच महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ५०१/- चे पारितोषिक दिले जाते.

स्व. नरसय्या बलराम बत्तीन यांचे स्मरणार्थ महाविद्यालयातून ११ वी शास्त्र व १२ वी शास्त्र परिक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थीस रु. २५१/- चे पारितोषिक दिले जाते.

महाविद्यालयात अपेक्षित अनु. जाती, अनु. जमाती, वि.जा.भ.ज., इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाच्या कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल. याबाबतची सूचना वेळोवेळी सूचना फलकावर लावली जाईल. याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी

- Women Councelling Study Centre - महाविद्यालयात मुलींना मार्गदर्शन करण्यासाठी Women Councelling & Study Centre असून प्रवेशीत मुलींनी सदर केंद्राची मदत घेवून आपला सर्वांगिण विकास साधावा.
- कमवा व शिका योजना - महाविद्यालयात गरीब व होतकरु विद्यार्थ्यासाठी कमवा व शिका योजनेची सोय आहे. इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी सदर योजनेची सूचना लावल्यानंतर त्यासाठी अर्ज करावे.
- **TS-SAF** ही महाविद्यालयातील प्राध्यापकांनी प्रायोजित केलेली योजना असून याव्दारे गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य/गणवेश/कॉलेज फी/सहल/प्रोजेक्टसाठी यथायोग्य मदत केली जाते. इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी सदर योजनेची सूचना लावल्यानंतर त्यासाठी अर्ज करावेत.

**कॉलेजप्रवेशासंबंधी** - प्रवेश देताना धर्म, जात, पंथ, पक्ष, प्रांत अशा कोणत्याही गोष्टीचा विचार केला जात नाही.

आर्टस् व सायन्स विद्याशाखेत प्रवेश घेतेवेळी प्रवेश-अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१) मागील परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे मूळ गुणपत्रक व त्याच्या दोन झेरॉक्स प्रती.
२) शाळा अथवा कॉलेज सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या दोन झेरॉक्स प्रती.
३) स्थलांतराचा दाखला-मूळ प्रत व झेरॉक्स प्रत. (इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी)
४) मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी जातीच्या दाखल्याच्या दोन झेरॉक्स प्रती.
५) आधार कार्ड दोन झेरॉक्स प्रती

शिक्षण सवलतीचे अर्ज विद्यार्थ्यांनी प्रवेश-अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

फक्त व्दितीय (बारावी) वर्षासाठी-खालीलप्रमाणे कागदपत्र आवश्यक :-

१) इ.बी.सी.फी माफीचा अर्ज.
२) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण फी माफीचा अर्ज.
३) माजी सैनिक फी माफीचा अर्ज - दोन प्रती.
४) स्वातंत्र्य सैनिक फी माफीचा अर्ज - दोन प्रती.
५) विद्यार्थिनींनी शिक्षणशुल्क माफीचा अर्ज.
६) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती किंवा फ्रिशिप फी सवलतीचा अर्ज.

## ✸ विद्यार्थ्यांसाठी नियमावली -

### उपस्थिती -

१) महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने प्रत्येक विषयाचा तासाला, सत्राला स्वतंत्ररित्या महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे वर्गात किमान ७५% हजर रहाणे आवश्यक आहे. अन्यथा सदर विद्यार्थी बोर्ड परीक्षेत बसण्यास अपात्र ठरतो आणि त्यांची फी सवलत रद्द होते याची विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी. अकरावीतील विद्यार्थ्यास प्रथमसत्र व व्दितीयसत्र परिक्षेस हजर राहणे बंधनकारक आहे. तसेच भाषा विषयाच्या तोंडी परीक्षा, प्रकल्पकार्य, पर्यावरण विषयाचा प्रकल्प वेळेत उपस्थित राहून पूर्ण करणे याची जबाबदारी विद्यार्थ्यांचीच राहील. याची नोंद घ्यावी.

२) काही महत्त्वाच्या कारणामुळे विद्यार्थी अनुपस्थित राहणार असेल तर विद्यार्थी व पालकाच्या सहीने तसा रितसर अर्ज वेळेत वर्ग शिक्षकामार्फत प्राचार्याकडे करुन पूर्वपरवानगी घेण्यात यावी. नंतर कोणताही सबब चालणार नाही. अन्यथा गैरहजर विद्यार्थ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाऊ शकते. महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांचे येथील शिक्षक पालकत्व स्विकारुन (Mentoring System) विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकडे लक्ष देतात.

३) नोकरी, खाजगी शिकवण्या, कॉम्प्युटर क्लासेस व इतर क्लासेसमुळे विद्यार्थी महाविद्यालयात गैरहजर राहिल्यास पालक व पाल्य पुढील होणाऱ्या परिणामास व कारवाईस जबाबदार राहतील.

४) अकरावीतील प्रत्येक विद्यार्थ्याने शारीरिक शिक्षण (P.E.) परीक्षा देणे बंधनकारक आहे. त्याशिवाय अकरावी परीक्षेचा निकाल दिला जाणार नाही.

५) विद्यार्थी वर्षभर गैरहजर राहिल्यास पुढीलवर्षी त्याला प्रवेश दिला जाणार नाही.

६) महाविद्यालयाच्या वेळेत कुठेही नोकरी करता येणार नाही.

७) जर महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यास पहिले सत्र सुरु झाल्यानंतर व प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर, प्रवेश रद्द करावयाचा झाल्यास त्याला शासन/विद्यापीठ नियमाप्रमाणे पहिल्या सत्राची संपूर्ण फी भरावी लागेल. तसेच दुसऱ्या सत्रात प्रवेश रद्द केल्यास संपूर्ण वर्षाची फी भरावी लागेल याची नोंद घ्यावी.

## ✹ शिस्त व वर्तणूक -

१) गणवेषाशिवाय महाविद्यालयात प्रवेश करु नये व ओळखपत्र नेहमी जवळ ठेवावे व शिक्षकांनी/प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी मागणी केल्यास ताबडतोब दाखवावे.

२) वर्ग सुरु असताना कोणत्याही विद्यार्थ्याने वर्गासमोरुन फिरु नये. प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाची शिस्त ही पाळलीच पाहिजे व कॉलेजच्या परिसरात कोणत्याही प्रकारचा गोंधळ करु नये.

३) विद्यार्थ्यांनी बाहेरील विद्यार्थ्यास वा व्यक्तीस पूर्वपरवानगीशिवाय महाविद्यालयात आणू नये. असे आढळल्यास संबंधीत विद्यार्थ्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४) कोणत्याही विद्यार्थ्याने महाविद्यालयीन आवारात पान,तंबाखू, मावा, च्यूइंगम किंवा तत्सम चघळणाऱ्या कोणत्याही पदार्थाचे सेवन करण्यास कायद्यानेच बंदी आहे. असे आढळल्यास संबंधीत विद्यार्थ्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५) प्रत्येक विद्यार्थ्याने वर्गात तासाला व प्रयोगशाळेत प्रात्यक्षिकांना वेळेवर व गणवेषातच उपस्थित राहावे. उशीरा येणाऱ्या विद्यार्थ्यास जाणीव शुल्क आकारण्यात येईल. विविध दुकानातून गणवेशाचे कापड विकत घेतल्याने रंग संगतीत बदल होत असल्याचे निदर्शनास आले आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाने सुचविलेल्या रंगाचेच गणवेषाचे कापड खरेदी करावे.

६) महाविद्यालयातील सामानाची (काचा, खुर्ची, टेबल, बेंच, लाईटसाहित्य इत्यादी) कोणीही मोडतोड, नासधूस करु नये व चोरी करु नये. अशी कृती करणाऱ्या विद्यार्थ्यांवर व्यक्तिश: किंवा सामुदायिक जाणीव शुल्क आकारुन भरपाई करण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांची नावे गैरवर्तनामुळे व इतर कांही कारणामुळे काळ्या यादीत येतील त्यांना पुढील शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार नाही.

७) विद्यार्थ्याने वर्गात फळ्यावर, भिंतीवर व सार्वत्रिक ठिकाणी थुंकू नये वा कोणत्याही प्रकारचे लिखाण करु नये. होळी व रंगपंचमीच्या काळात, महाविद्यालयात रंग खेळू नयेत. रंग खेळताना आढळल्यास सदर विद्यार्थ्याचे प्रवेश रद्द करण्यात येईल.

८) महाविद्यालयात हेडफोन व मोबाईलच्या वापरास सक्त मनाई आहे.

९) तास संपल्यानंतर विद्यार्थ्याने पॅसेजमध्ये, गेटमध्ये थांबू नये. तास नसेल तर ग्रंथालयात अथवा रिडींगरुममध्ये थांबावे. महाविद्यालयाची वेळ संपल्यानंतर कोणीही वर्गात अथवा आवारात थांबू नये.

१०) ऑफिसमधील आवश्यक माहिती/कागदपत्र रितसर छापील मागणी अर्ज सादर केल्यापासून तीन दिवसांनी मिळेल. (एल.सी. किंवा टी.सी.साठी अधिक एक दिवस लागण्याची शक्यता आहे.)

११) विद्यार्थ्याने तास सोडून कार्यालयीन कामकाजाच्या पूर्ततेसाठी जाऊ नये तास संपल्यानंतर किंवा शिक्षकांच्या पूर्वपरवानगीने कार्यालयीन वेळेतच भेटावे.

१२) विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थ्यांमध्ये भांडण, तंटा केल्याचे आढळल्यास संबंधित विद्यार्थ्यांवर योग्य ती कारवाई करुन त्याचे नांव महाविद्या–लयातून कमी केले जाईल.

१३) विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जावर पालकांची सही पालकानेच करावी. पालकाची सही इतर कोणी केल्याचे आढळून आल्यास विद्यार्थ्यावर दंडात्मक करावाई करुन त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

१४) महाविद्यालयात कोणताही कार्यक्रम करताना विद्यार्थ्यांनी प्राचार्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१५) विजेचा अनियमित पुरवठा व भारनियमनामुळे निर्माण झालेली परिस्थिती आणि शास्त्र प्रयोग शाळांना लागणाऱ्या व्यवसायिक गॅस सिलेंडर्सची दरवाढ लक्षात घेता प्रत्येक शास्त्र विद्यार्थ्यास प्रवेश घेताना रु. ५०/– जादा शुल्क आकारण्यात येईल.

१६) ओळखपत्रावर दिलेल्या तारखेच्या आत सही करुन घ्यावी.

१७) विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना घेतलेलें विषय तसेच माध्यम व तुकडी बदलून दिली जाणार नाही. विद्यार्थ्यांनी ११ वीत प्रवेश घेताना घेतलेले विषय व माध्यम तसेच तुकडी बदलता येणार नाही. (इ. ११ वी सायन्स वर्गातील विद्यार्थ्यांना १२ वीत विषय बदलता येणार नाही.

१८) अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

१९) **स्थानिक महाविद्यालयतून ११ वी पास झालेल्या विद्यार्थ्यांना महविद्यालयात १२ वी या वर्गात प्रवेश दिला जाणार नाही.**

२०) वरील नियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही बाबींचा निर्णय घेण्याचा अधिकार प्राचार्यांना असून त्यासंबंधी कोणतीही तक्रार चालणार नाही.

२१) परीक्षेचे निकाल लागल्यानंतर वेळोवेळी त्यासंबंधी सूचना नोटीस बोर्डवर लावली जाईल व त्यानुसारच नमूद केलेल्या मुदतीत प्रवेश दिले जातील त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

२२) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी ३१ ऑगस्ट पूर्वी शिष्यवृत्तीबाबत सर्व बाबींची पूर्तता करुन महाविद्यालयाच्या आवारातील बँकेत बचत खाते उघडावे व कार्यालयास तशी माहिती द्यावी.

२३) बोर्डाकडून आलेले एच.एस. सी. प्रमाणपत्र ताब्यात घेते वेळी विद्यार्थी समक्ष हजर असणे अवश्यक आहे, सदर प्रमाणपत्रावर विद्यार्थ्याने प्राचार्यांच्या समक्ष स्वाक्षरी केल्यानंतर विद्यार्थ्यास प्रमाणपत्र दिले जाईल.

२४) दहावीची मूळ गुणपत्रिका प्रवेश घेतल्यापासून सहा महिन्यात परत घेतली पाहिजे.

२५) महाविद्यालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या कोणत्याही कागदपत्राच्या पडताळणीसाठी रु. ५००/- फी भरावी लागेल.

✸ **सूचना वार्ता -**

१) महत्त्वाच्या सूचना वार्ता फलकावरच (नोटीस बोर्डवर) वेळीवेळी लावल्या जातील. त्या विद्यार्थ्यांनी नियमित वाचून त्याप्रमाणे पूर्तता करावी. सूचना पाहिली नाही, वाचली नाही व माहिती नाही अशी तक्रार चालणार नाहीत. फलकावर लावलेली सूचना न पाहिल्याने होणाऱ्या नुकसानीस विद्यार्थीच ज़बाबदार राहिल.

२) सर्व विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौध्दिक व शैक्षणिक विकासासाठी हे महाविद्यालय सतत प्रयत्नशील आहे. आपणास या महाविद्यालयात ज्या ठिकाणी उणीवा, अडचणी, गैरसोयी अगर शैक्षणिक कमतरता जाणवत असेल तर आपण आपले मनोगत सूचना पेटीत टाकावे किंवा मा. प्राचार्यांना समक्ष भेटून सांगावे. सूचना पेटीतील आपले मनोगत, भावना व विधायक सूचना टाकताना आपले नांव, वर्ग, रोल नंबर, आदिंचा उल्लेख करावा अन्यथा सूचनांचा विचार केला जाणार नाही.

टीप :- सूचनापेटी प्राचार्यांच्या कार्यालयाजवळ लावण्यात आली आहे.

## ✷ तक्रारनिवारण -

१) प्राध्यापकांच्या शिकवण्याबाबत, हजेरीबाबत किंवा स्वभावाबाबत काही सांगावयाचे असल्यास विद्यार्थ्यांनी किंवा पालकांनी आपले म्हणणे मा. प्राचार्याकडे त्वरीत द्यावे.

२) तसेच प्रस्थापित सोयी, सवलतींचा आणि नियम व अटींचा विचार करुनच महाविद्यालयात प्रवेश घ्यावा. प्रवेश घेतल्यानंतर अशा अडचणी व सवलतीबाबत तक्रार चालणार नाही याची विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी.

३) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना काही अडचणी आल्यास त्यांनी स्वत: लेखीस्वरुपात मा. प्राचार्यांकडे मांडाव्यात. कोणत्याही बहिस्थामार्फत अडचणी मांडू नयेत. महाविद्यालय अंतर्गत अडचणी बाहेरील व्यक्तींमार्फत मांडल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

## ✷ वाहनतळ -

१) विद्यार्थ्यांनी आपली वाहने सायकल, स्कूटर, मोपेड, मो. सायकल इत्यादी ठरवून दिलेल्या ठिकाणी ठेवावीत. वाहनतळासाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क घेतले जात नाही, तरी वाहन चोरीस गेल्यास, मोडतोड झाल्यास अथवा वाहनाचे एखादा भाग चोरीला गेल्यास त्याची जबाबदारी संस्था अथवा महाविद्यालयावर राहणार नाही. विद्यार्थ्यांनी दुसऱ्या कोणाच्याही वाहनावर बसू नये अन्यथा त्यांचेवर कारवाई करण्यात येईल.

२) वाहनतळावरील गाडीवर बसून गप्पा मारणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनींना रु. ५०/- जाणीव शुल्क भरावे लागेल.

३) वाहने दिलेल्या मार्गानेच आत किंवा बाहेर न्यावीत /आणावीत.

## ✷ सांस्कृतीक कार्यक्रम -

महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन मा. प्राचार्यांच्या परवानगीनेच करावे. महाविद्यालयाच्या निवडणूका, स्नेहसंमेलन व इतर कार्यक्रम रद्द करण्याचा किंवा चालू ठेवण्याचा अंतिम निर्णय प्राचार्यांचाच राहील. पुनर्विचाराबाबत विद्यार्थ्यांची कुठलीही सबब ऐकून घेतली जाणार नाही. सर्व कार्यक्रमाचे आयोजन शैक्षणिक तास संपल्यानंतरच होईल.

## ✷ माजी विद्यार्थी व पालक - शिक्षक संघटना

महाविद्यालयात पालक-शिक्षक संघटना आणि माजी विद्यार्थी संघटना कार्यरत असून सदर संघटनेतर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात.

* **प्रवेश -**
  - <u>जैन अल्पसंख्याक शिक्षण संस्था असल्याने शासन नियमानुसार ५०% जागा जैन धर्मिय विद्यार्थ्यांसाठी राखीव आहेत.</u>
  - विषय – समूह या महाविद्यालयामध्ये शिकविले जातात त्याविषयासाठीच प्रवेश दिला जाईल.

**योग्य त्या विषयसमुहाची निवड करावी. प्रवेश अर्जात भरलेले विषय व परीक्षाफॉर्ममध्ये भरलेले विषय सारखेच असणे आवश्यक आहे. चुकीचे विषय निवडले व परीक्षा फॉर्म भरण्यात आले तर होणाऱ्या नुकसानीस विद्यार्थी जबाबदार असतील. एकदा निवडलेले विषय कोणत्याही सबबीवर बदलता येणार नाहीत.**

* कॉलेज प्रवेशअर्जाचे कॉलम स्वहस्ताक्षरात भरावयाचे आहेत. अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.
* कॉलेज प्रवेशअर्ज व ओळखपत्रकावर स्वत:चाच अलीकडचा रंगीत फोटो लावण्यात यावा. डुप्लीकेट ओळखपत्र देण्यात येणार नाही. ओळखपत्र सांभाळावे व ते सतत जवळ बाळगावे. प्राध्यापकांनी/प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी मागितल्यास ते त्यांना दाखवावे. ओळखपत्र व ड्रेसकोड शिवाय कॉलेजमध्ये येऊ नये. महाविद्यालयाने दिलेले ओळखपत्र गळ्यात घातलेले असावे. अन्यथा जाणीव शुल्क आकारण्यात येईल.
* **वरील सर्व अटी व नियम मान्य असल्यासच या महाविद्यालयात प्रवेश घ्यावा.**

# आर्टस् विभाग

## एफ. वाय. जे. सी. (अकरावी आर्टस्)

प्रवेश पात्रता - इंग्रजी हा विषय घेऊन १० वी उत्तीर्ण.

शासकीय नियमाप्रमाणे सात विषयांचा अभ्यासक्रम -

आवश्यक -

१) इंग्रजी
२) पर्यावरण
३) मराठी
४) भूगोल

ऐच्छिक - खालीलपैकी एका विषयाची निवड करावी.

M ) अर्धमागधी
N) इतिहास
O) हिंदी

आणि खालीलपैकी एका समुहाची निवड करावी.

A) अर्थशास्त्र आणि मानसशास्त्र
B) अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र
C) राज्यशास्त्र आणि मानसशास्त्र
D) राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र

**शारीरिक शिक्षण :-**

वरील विषयाशिवाय शारीरिक शिक्षण हा विषय अभ्यासक्रमात असून ११ वीतील विद्यार्थ्यांची शारीरिक शिक्षण परीक्षा घेऊन ग्रेड दिली जाते.

## एस. वाय. जे. सी. (बारावी आर्ट्स)

**अभ्यासक्रम - या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अकरावीसाठी घेतलेले विषयच बारावीसाठी घ्यावे लागतात.**

# सायन्स विभाग

## एफ. वाय. जे. सी. (अकरावी सायन्स)

**प्रवेश पात्रता –** शासकीय नियमाप्रमाणे –

१) इंग्रजी विषय घेऊन शालांत परीक्षा उत्तीर्ण

२) शालांत परीक्षेत सायन्स विषयात किमान ४० टक्के गुण आवश्यक

**सात विषयांचा अभ्यासक्रम :**

१) इंग्रजी (आवश्यक),

२) पर्यावरण शास्त्र

३) मराठी किंवा हिंदी किंवा संस्कृत

**ऐच्छिक :**

४) भौतिकशास्त्र, (Physics)

५) रसायनशास्त्र (Chemistry)

**कोणतेही दोन विषय**

६) गणित (Mathematics)

७) जीवशास्त्र (Biology)

८) भूगर्भशास्त्र (Geology)

* **इलेक्ट्रॉनिक्स विद्यार्थ्यांसाठी : (१०० विद्यार्थी)**

१) इंग्रजी

२) पर्यावरण शास्त्र

३) भौतिकशास्त्र

४) रसायनशास्त्र

५) गणित

६) इलेक्ट्रॉनिक्स

* **शारीरिक शिक्षण :**

वरील विषयाशिवाय शारीरिक शिक्षण (P.E.) हा विषय अभ्यासक्रमात आहे. अकरावीतील विद्यार्थ्यांची शारीरिक शिक्षण परीक्षा घेऊन त्याना 'ग्रेड' दिली जाते.

* **इ. ११ वी मध्ये घेतलेले विषय कोणत्याही परिस्थितीत १२ वी मध्ये बदलता येणार नाहीत.**

# नवीन अभ्यासक्रम

- शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून महाविद्यालयाच्या शास्त्र शाखेत बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी हा अभ्यासक्रम, शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून एम.एस्सी. बायोइन्फॉरमेटिक आणि एम.एस्सी. जेनेटिक्स व एम.एस्सी. इनॉर्गॅनिक केमिस्ट्री हे अभ्यासक्रम सुरू झालेले असून यासाठी अद्ययावत प्रयोगशाळा, प्रशिक्षित शिक्षकवर्ग व कर्मचारी वर्ग नेमण्यात आलेले आहेत.

- सन २०११-१२ पासून एम.ए. भूगोल (मराठी माध्यम) व एम.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी तर २०१६-१७ पासून एम.एस्सी. नॅनोटेक्नॉलॉजी हे विषय सुरू झाले आहेत.

- जून २००८-०९ या वर्षापासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे बी.ए./बी.कॉम., वृत्तपत्रविद्या पदवी व पदविका, तसेच एम.बी.ए.इ. अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत. याचा नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना लाभ घ्यावा व प्रवेशासंबंधी व अधिक माहितीसाठी कनिष्ठ महाविद्यालयातील श्री. पी.व्ही. पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

- महाविद्यालयात एम. फिल / पीएचडी रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र, इंग्रजी, इतिहास, हिंदी, अर्थशास्त्र, मराठी, राज्यशास्त्र, प्राकृत, समाजशास्त्र, समाजकार्य, ग्रंथालय व माहितीशास्त्र आदी विषय शिकविण्याची सोय करण्यात आलेली आहे.

# विनाअनुदानित तुकडी

## एफ. वाय. जे. सी. (अकरावी सायन्स)
## व
## एस.वाय.जे.सी. (बारावी सायन्स)

**वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेण्याकरिता प्रवेश परीक्षा अनिवार्य आहे. याचा विचार करून संस्थेने शैक्षणिक वर्ष २००८ पासून इयत्ता ११ वी शास्त्र व २००९ पासून इयत्ता १२ वी शास्त्र शाखेसाठी विनाअनुदान तत्त्वावर नवीन तुकडी सुरू केलेली आहे. या तुकडीसाठी खालील विषय शिकवण्याची सोय आहे.**

| आवश्यक विषय | ऐच्छिक विषय (खालीलपैकी एका गटाची निवड करावी | | | |
|---|---|---|---|---|
| इंग्लिश (१००)<br>फिजिक्स (१००)<br>केमिस्ट्री (१००)<br>इनव्हायरमेंट एज्युकेशन (५०) | गट 'अ' | मॅथेमॅटिक्स (१००) | कॉम्प्युटर किंवा इलेक्ट्रॉनिक्स सायन्स (२००) | |
| | गट 'अ' | बायोलॉजी (१००) | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (१००) | मराठी / हिंदी / संस्कृत } कोणताही एक विषय निवडावा (१००) |

या तुकडीतील विद्यार्थ्यांना वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेकरिता संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या जे.ई.ई./एन.इ.इ.टी. क्लासेसना प्रवेश घेणे बंधनकारक राहील.

# Walchand College of Arts & Science, Solapur
# Junior College fee Chart

| Class | Paying | EBC/PTC/ GC/EXSE | SC/ST/OBC SBC/VJ/NT |
|---|---|---|---|
| XI Arts | 755 | 415 | 540 |
| XII Arts | 755 | 405 | 535 |
| XI Science | 1020 | 680 | 735 |
| XII Science | 1005 | 655 | 715 |
| XI Science (with Electronics) | 2420 | 2080 | 2135 |
| XII Science (with Electronics) | 2405 | 2055 | 2115 |

**NON GRANT SECTION**

| Class | XI | XII |
|---|---|---|
| Science-NG | 39010 | 38910 |
| Science-NG (Electronics) | 45210 | 45110 |
| Science-NG (Computer Sci.) | 45210 | 45110 |
| Science-NG (Information Tech.) | 42110 | 42010 |
| Science-NG (JEE, Biotech, Elect) | 70210 | 70110 |
| Science-NG (JEE, Computer Sci.) | 70210 | 70110 |
| Science-NG (JEE, Information Tech.) | 67110 | 67010 |

* Revised fee if any will have to be Paid by Student.

# वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड सायन्स, सोलापूर

## कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक

**प्राचार्य डॉ. एस. व्ही. कोटी**
एम्.ए., सेट, नेट, पीजीडीटीई, पीएच.डी.

**श्री. एस. व्ही. शहा** एम्.एस्सी., बी.एड.
उप प्राचार्य कनिष्ठ महाविद्यालय रसायनशास्त्र

### इंग्रजी विभाग

**श्री. एस.एन.पुजारी** एम.ए., बी.एड., डी.सी.ए.
**श्रीमती व्ही. जी. तडकल** एम.ए., बी.एड.
**श्री. ए. पी. म्हेत्रे** एम.ए., बी.एड.

### मराठी विभाग

**श्री. पी. व्ही. पाटील** एम्.ए., बी.एड्.
**श्री. सी. ए. तुपकर** एम्.ए., बी.एड्.
**श्री. सी.पी. कस्तुरे** एम्.ए., बी.एड्.

### समाजशास्त्र विभाग

**श्री. एस.एस. कुलकर्णी** एम्.ए., बी.एड्.

### मानसशास्त्र विभाग

**श्री. एस.एस. विठ्ठलदास** एम्.ए., बी.एड्.

### अर्धमागधी विभाग

**सौ. एम.एम. शास्त्री** एम्.ए., बी.एड्.

### इलेक्ट्रॉनिक्स विभाग

**श्री. आर. पी. कुलकर्णी** डी.आय.ई., ए.एम.आय.ई.
**श्री. एन. आर. पुजारी** डी.आय.ई., डी.सी.एम., ई.टी.ई.
**सौ. डी.व्ही. दिवाणजी** डी.ई.ई., बी.सी.ए.

### भूगोल विभाग

**श्री. एस. एस. चेंडकापुरे** एम्.ए., बी.एड्.
**श्री. ए. ए. सरवळे** एम्.ए., बी.एड्.

### अर्थशास्त्र विभाग

**श्री. टी. बी. ढोले** एम. ए. बी. एड.

### राज्यशास्त्र विभाग

**श्री. व्ही. व्ही. वाघमोडे** एम्.ए., बी.एड्.

### गणित विभाग

**कु. एम. पी. जैन** एम्.एस्सी., बी.एड्.
**श्री. एस. एस. शिंदे** एम्.एस्सी., बी.एड्.
**श्री. जे.बी. कस्तुरे** एम.एस्सी., एम.एड.,पीएच.डी.

### संस्कृत विभाग

**श्री. एस.एस. बोराळकर** एम्.ए., बी.एड्.

### माहितीतंत्रज्ञान व संगणक विभाग

**श्री. पी. आर. जोशी** बी.एस्सी., एम्.सी.एम्.
**श्री. व्ही. एस. कोनापुरे** एम.सी.ए.

## रसायनशास्त्र विभाग

**श्री. एस. व्ही. शहा** उपप्राचार्य, एम्.एस्सी., बी.एड्.
**श्री. एम. आय. किरणगी** एम्.एस्सी., बी.एड्.
**सौ. व्ही. व्ही, गांधी** एम्.एस्सी., बी.एड्.
**सौ. आर. व्ही. शिंदे** एम.एस्सी., बी.एड.
**श्री. एस.एस. जनगोंड** एम.एस्सी., बी.एड.

## भौतिकशास्त्र विभाग

**श्री. व्ही. व्ही. लोंढे** एम्.एस्सी., बी.एड्
**सौ. एच. यु. छेडा** एम्.एस्सी., बी.एड्
**श्री. एस. व्ही. पंडीत** एम्.एस्सी., बी.एड्
**श्री. पी. आर. गोडसे** एम्.एस्सी., बी.एड्
**श्री. डी.एस. जिडगीकर** एम्.एस्सी., बी.एड्

## जीवशास्त्र विभाग

**श्री. डी. व्ही. शहा** एम्.एस्सी., बी.एड्. एम. फील., ए.डी.सी.ए.,
**कु. ए. एम. शिंदे** एम्.एस्सी., बी.एड्.
**श्री. एन. जी. भिडे** एम्.एस्सी., बी.एड्.
**श्री. एस.एस. साळुंके** एस.एस्सी., बी.एड.
**सौ. एस.पी. डोळस** एम.एस्सी., बी.एड.

## हिंदी विभाग

**श्री. आर. सी. काळे** बी.ए., एम.एड्.

## ग्रंथालय

**डॉ. सौ. व्ही. एस. गवळी**
बी.एस्सी., एम.लिब., सायन्स, एम. एड., सेट., पी.एच.डी.

## शारिरीक शिक्षण विभाग

**श्री. आर. एस. हजारे** बी.ए., एम.पी.एड.

# शिक्षकेतर कर्मचारी

## वर्ग - ३

| | | |
|---|---|---|
| १) श्री. ए. बी. संगवे | एम. कॉम. | – अधिक्षक |
| २) श्री. ए. ए. सय्यद | बी. कॉम. | – लघुलेखक |
| ३) श्री. एस. के. सरसमकर | बी. कॉम. | – मुख्य लिपिक |
| ४) श्री. एम. एम. मुळकुटकर | बी. कॉम. | – वरीष्ठ लिपिक |
| ५) श्री. बी. डी. खुरगावकर | बी. कॉम. | – कनिष्ठ लिपिक |
| ६) श्री. वाय. बी. अहीरे | बी. ए. | – कनिष्ठ लिपिक |
| ७) श्री. आर. व्ही. कस्तुरकर | एम. ए. एम. लिब., एम. फिल | – सहाय्यक ग्रंथपाल |
| ८) श्री. एन. बी. दुधलवार | बी. ए. | – ग्रंथालय लिपिक |
| ९) श्री. आर. जे. पांढरे | बी. कॉम., डी.सी.एम. | – कनिष्ठ लिपिक |
| १०) श्री. एस. बी. कळसकर | बी. कॉम. | – कनिष्ठ लिपिक |
| ११) सौ. डी. आर. शहा | बी. ए. एम. लीब. | – ग्रंथालय लिपिक |
| १२) श्री. डी. एस. बोधले | एस. एस. सी. | – प्रयोगशाळा सहाय्यक |
| १३) श्री. जी. एस. सोनकवडे | एच. एस. सी. | – प्रयोगशाळा सहाय्यक |
| १४) सौ. एस. व्ही. पंडीत | बी.एस्सी., बी.एड्. | – प्रयोगशाळा सहाय्यक |
| १५) कु. डी. एम. डांगे | बी. एस्सी. | – प्रयोगशाळा सहाय्यक |
| १६) कु. ए. व्ही. हिरेमठ | बी. एस्सी. | – प्रयोगशाळा सहाय्यक |
| १७) श्री. पी. आर. शिंदे | बी. एस्सी. | – प्रयोगशाळा सहाय्यक |

# शिक्षकेतर कर्मचारी

## वर्ग – ४

| | | |
|---|---|---|
| १८) श्री. एन. आर. गुंड | ९ वी | – प्रयोगशाळा परिचर |
| १९) श्री. डी. पी. चिंदे | ९ वी | – प्रयोगशाळा परिचर |
| २०) श्री. ए. एस. पतंगराव | ९ वी | – प्रयोगशाळा परिचर |
| २१) श्री. डी. एस. पवार | एच. एस. सी. | – प्रयोगशाळा परिचर |
| २२) श्री. के. पी. चव्हाण | ९ वी | – प्रयोगशाळा परिचर |
| २३) श्री. आर. एस. कलशेट्टी | ९ वी | – प्रयोगशाळा परिचर |
| २४) श्री. आर. के. फटफटवाले | एस. एस. सी. | – प्रयोगशाळा परिचर |
| २५) श्री. एस. एस. जुनवणे | एम. ए | – प्रयोगशाळा परिचर |
| २६) श्री. आर. आर. पांढरे | एस. एस. सी. | – प्रयोगशाळा परिचर |
| २७) श्री. एच. जी. काळे | ९ वी | – प्रयोगशाळा परिचर |
| २८) श्री. बी. एन. होनकसे | एस. एस. सी. | – प्रयोगशाळा परिचर |
| २९) श्री. ए. एम. बोंदार्डे | एस. एस. सी. | – प्रयोगशाळा परिचर |
| ३०) श्री. बी. एल. शेटगार | एम. ए. | – प्रयोगशाळा परिचर |
| ३१) श्री. ओ. एल. फटाले | बी. ए. | – प्रयोगशाळा परिचर |
| ३२) श्री. ए. आर. कस्सा | एस. एस. सी. | – प्रयोगशाळा परिचर |
| ३३) श्री. डी. आर. ननवरे | ११ वी | – प्रयोगशाळा परिचर |
| ३४) श्री. एस. एन. व्हंड्राव | बी. ए. | – प्रयोगशाळा परिचर |
| ३५) श्री. एम. व्ही. मोहोळकर | बी. कॉम. | – प्रयोगशाळा परिचर |
| ३६) श्री. आर. एम. सुतार | एच.एस.सी. | – प्रयोगशाळा परिचर |

# शिक्षकेतर कर्मचारी

## वर्ग – ४

| | | |
|---|---|---|
| ३७) श्री. जी. आर. बिराजदार | ९ वी | - प्रयोगशाळा परिचर |
| ३८) श्री. आर. एस. स्वामी | बी.ए | - प्रयोगशाळा परिचर |
| ३९) श्री. एस. जी. पाटील | ११ वी | - प्रयोगशाळा परिचर |
| ४०) श्री. एस. एस. उपळकर | एस.एस.सी. | - प्रयोगशाळा परिचर |
| ४१) श्री. एम. एन. कदम | एच.एस.सी. | - प्रयोगशाळा परिचर |
| ४२) श्री. आर.एस. साळुंके | एच.एस.सी. | - प्रयोगशाळा परिचर |
| ४३) श्री. पी. एम. म्हमाणे | आठवी | - प्रयोगशाळा परिचर |
| ४४) श्री. ए. एम. आवाशंक | एच.एस.सी.,एल.टी.सी. | - ग्रंथालय परिचर |
| ४५) श्री. एम. एन. काळे | ९ वी | - ग्रंथालय परिचर |
| ४६) श्री. व्ही. एन. कदम | ९ वी | - ग्रंथालय परिचर |
| ४७) श्रीमती एस.बी. शिंदे | ९ वी | - ग्रंथालय परिचर |
| ४८) श्री. एस. एस. कोरे | एस.एस.सी. | - ग्रंथालय परिचर |
| ४९) श्री. के. पी. शेटे | बी.ए., एल.टी.सी. | - ग्रंथालय परिचर |
| ५०) श्री. वाय. पी. पाटील | बी.ए.बी.लीब | - ग्रंथालय परिचर |
| ५१) श्री. एम. एन. लोखंडे | ७ वी | - शिपाई तथा झाडूवाला |
| ५२) श्रीमती एस. ए. लोंढे | १ ली | - शिपाई तथा झाडूवाला |
| ५३) श्री. पी. बी. लिंबोळे | ४थी | - शिपाई तथा झाडूवाला |
| ५४) श्री. एस. डी. कासार | एच.एस.सी. | - शिपाई तथा झाडूवाला |
| ५५) श्री. डी. व्ही. बडवणे | ९ वी | - शिपाई तथा मदतनीस |
| ५६) श्री. एस. एस. भुमकर | ९ वी | - शिपाई तथा झाडूवाला |
| ५७) श्री. एच. आर. पांढरे | ९ वी | - शिपाई तथा झाडूवाला |

# List of Meritorius Student at H.S.C. Exam

| SR. NO. | NAME | YEAR | MERIT ORDER |
|---|---|---|---|
| 1. | Miss. Shah R. K. | 1998 | 8th |
| 2. | Mr. Joshi H. N. | 1998 | 9th |
| 3. | Mr. Shah M. P. | 1998 | 11th |
| 4. | Miss. Khedkar K. R. | 1998 | 14th |
| 5. | Miss. Datar Y. G. | 1998 | 16th |
| 6. | Mr. Ramdasi R. V. | 1998 | 8th |
| 7. | Mr. Patil J. S. | 1999 | 2nd |
| 8. | Mr. Pansare S. S. | 1999 | 4th |
| 9. | Miss. Bairav J. K. | 1999 | 7th |
| 10. | Miss. Shah V. S. | 1999 | 9th |
| 11. | Mr. Deshpande A. A. | 1999 | 10th |
| 12. | Mr. Karogal I. S. | 1999 | 12th |
| 13. | Mr. Kandalgaonkar R. K. | 1999 | 14th |
| 14. | Mr. Kulkarni R. R. | 2000 | 8th |
| 15. | Mr. Kulkarni R. V. | 2000 | 9th |
| 16. | Mr. Kulkarni P. M. | 2000 | 10th |
| 17. | Mr. Agrawal A. P. | 2000 | 13th |
| 18. | Miss. Bhat U. U. | 2000 | 15th |
| 19. | Mr. Nirali S. S. | 2001 | 9th |
| 20. | Mr. Kulkarni N. P. | 2001 | 10th |
| 21. | Mr. Kulkarni S. K. | 2001 | 11th |
| 22. | Mr. Bendre M. D. | 2001 | 14th |
| 23. | Miss. Khatri D. S. | 2002 | 4th |
| 24. | Miss. Gaikwad R. R. | 2002 | 14th |
| 25. | Mr. Gavali S. S. | 2002 | 15th |
| 26. | Mr. Mantri L. G. | 2003 | 11th |
| 27. | Mr. Thomas T. A. T. | 2003 | 15th |
| 28. | Miss. Waghmare J. N. | 2003 | 13th in Arts & 1st in Backward Class |
| 29. | Mr. Gaikwad C. Y. | 2004 | 12th |
| 30. | Mr. Godbole A. G. | 2005 | 5th |
| 31. | Mr. Patil S. S. | 2005 | 9th |
| 32. | Mr. Kale H. K. | 2006 | 12th |
| 33. | Miss. Mehta S. A. | 2007 | 3th |
| 34. | Mr. Dhanave S. D. | 2007 | 2nd Reserved Category |
| 35. | Mr. Habbu N. S. | 2008 | 1st in Solapur Dist. |
| 36. | Mr. Udata A. S. | 2010 | 1st in Pune Divisianl Board |

गगनाला गवसणी घालणारे उत्तुंग व्यक्तिमत्व

# उद्योगपती वालचंद हिराचंद : एका दृष्टिक्षेपात

| | | |
|---|---|---|
| * सोलापूर येथे जन्म | : | २३ नोव्हेंबर १८८२ |
| * पिता:श्री शेठ हिराचंद नेमचंद | | |
| * माता:सौ. राजुबाई हिराचंद | | |
| * मातृवियोग | : | १८८२ |
| * सोलापूर येथे मॅट्रीक | : | १८९९ |
| * पहिला विवाह | : | १९०० |
| * बी.ए.च्या वर्गात असताना कॉलेज सोडले | : | १९०२ |
| * फाटकशी भागीदारी | : | १९०४ |
| * जी.आय.पी. रेल्वे लाईनचे काम | : | १९०५ |
| * कन्यारत्नाची प्राप्ती–नाव चतुराबाई | : | १९०७ |
| * पत्नीचा वियोग | : | १९०७ |
| * हार्बर ब्रँच रेल्वेचे काम | : | १९१० |
| * व्दितीय विवाह (सौ. कस्तुरबाई) | : | १९१३ |
| * फाटक वालचंद कंपनीची स्थापना | : | १९१५ |
| * सिंदिया स्टीम नेव्हिगेशन कंपनीची स्थापना | : | १९१९ |
| * पहिला परदेश प्रवास | : | १९१९ |
| * टाटा कन्स्ट्रक्शनशी संबंध | : | १९२० |
| * हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन– इंडियन ह्यूम पाईप कंपनीची स्थापना | : | १९२६ |
| * महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना | : | १९२७ |
| * सी. आय. ई. पदवी | : | १९२८ |
| * बोरघाट बोगद्याचे उद्‌घाटन | : | १९२८ |
| * रावळगाव शुगर फर्मची स्थापना | : | १९३२ |
| * वालचंदनगर इंडस्ट्रीज कंपनीची स्थापना | : | १९३४ |
| * पिताजींचा वियोग | : | १९३८ |
| * कन्स्ट्रक्शन हाऊसची स्थापना | : | १९३८ |
| * विमान बांधणी उद्योग–हिंदुस्थान एअर क्राफ्ट कंपनी प्रारंभ | : | १९४० |
| * नौका बांधणी उद्योग प्रारंभ | : | १९४१ |
| * प्रिमियर मोटार कारखान्याची स्थापना | : | १९४४ |
| * सर्व उद्योगातून निवृत्ती | : | १९५० |
| * निर्वाण – सिध्दपूर येथे | : | ८ एप्रिल १९५३ |



4486

# वालचंद कॉलेज ऑफ
# आर्टस् अॅण्ड सायन्स, सोलापूर .

वालचंद हिराचंद मार्ग, अशोक चौक, सोलापूर – ४१३ ००६.

ज्युनिअर कॉलेज

मुल्य रु. ५०/-